॥ श्री भक्ती श्री हरीप्राप्ती मुक्ती ॥ ॥ श्री भक्ती श्री हरीप्राप्ती मुक्ती ॥ ॥ श्री भक्ती श्री हरीप्राप्ती मुक्ती ॥

॥ ॐ ॥

# आरती श्रीहरींची

जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ धृ ॥

युगोयुगी अवतरशी श्रीरंगा । संतसज्जना तारिशी प्रसंगा
रुक्मिणीवरा विश्वाहुनी उत्तुंगा । भक्तांसाठी सोशी भार गिरीधारी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ १ ॥

शोभे अनंत नामे अनंत गुणे । अतिभव्य व्याप्ती विश्वही उणे
धावा करिता धावतसे क्षणे । विठ्ठल रुपे निवास पंढरी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ २॥

जय जय श्री जगद्गुरु । भक्तोद्धारी दृढ निर्धारु
धोक्यात येता सदाचार तारु । साकारुनी विश्वेश्वर सावरी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ ३ ॥

॥ श्री भक्ती श्री हरीप्राप्ती मुक्ती ॥ ॥ श्री भक्ती श्री हरीप्राप्ती मुक्ती ॥ ॥ श्री भक्ती श्री हरीप्राप्ती मुक्ती ॥

भक्ती दिसता दारिद्रय झोपडी । सर्वेश्वर धावे बहू आवडी
उद्धाराचा क्षणही न दवडी । विष्णू नारायण ऐसा तत्परी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ ४ ॥

कुरुक्षेत्री गीता वर्तिली पार्था । अनंत अमृतची ते परमार्था
ध्याता आचरता जन्म सार्था । परमेश्वरा तू अजोड परोपकारी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ ५ ॥

मानसी परमेशा भक्तिबंधना । पुरविशी देवा भक्तकामना
कधी न विसरे दिल्या वचना । बहू भक्तिलुब्ध सुदर्शनधारी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ ६ ॥

मीराईसाठी देवा वीष तू प्राशिले । जनाईसाथी दळण तू दळिले
चोखोबा गोरोबांच्या कामासी केले । सर्वशक्तीमान लहानपणा स्वीकारी
जय जय परब्रह्म श्रीहरी । आरती ओवाळू तुज मुरारी ॥ ७ ॥

॥ ॐ ॥ ॐ ॥ ॐ ॥